# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{सा.बां.वि.(प्रकल्प)}**

नागपूर शहरातील “Nagpur Healthy Street Programme” संकल्पनेतुन वॉकेबल स्ट्रीट प्रकल्पा अंतर्गत सेंट्रल बाजार रोड (लोकमत चौक ते व्हि.एन.आय.टी.गेट) या रस्त्याचा विकास करण्याचे कामास्तव रू. १९,०७,४४,०४२/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

1. प्रस्तुत कामाकरिता सन २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रका मधील पद क्र. A २८९०१३४१००२ अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.
2. सदर कामाकरिता मा. मुख्य अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
3. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 163/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/11/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील “Nagpur Healthy Street Programme” संकल्पनेतुन वॉकेबल स्ट्रीट प्रकल्पा अंतर्गत सेंट्रल बाजार रोड (लोकमत चौक ते व्हि.एन.आय.टी.गेट) या रस्त्याचा विकास करण्याचे कामास्तव रू. १९,०७,४४,०४२/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**